सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग
महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ,
शासकीय तंत्र निकेतन इमारत ,क-विभाग ,४९,खेरवाडी,वांद्रे (पूर्व),मुबई-४०००५१.
दूरध्वनी क्रमांक :०२२-२६४७४४३५. ई-मेल : secretary@msbsde.edu.in संकेतस्थळ :www.msbsde.edu.in

दिनांक :२८/०९/२०२१

जा.क्र.मराकौविमं/का-१/२०२१-२२/३५१६

परिपत्रक

**विषय:-महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत राबविण्यात येणारे व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यास इच्छुक असलेल्या संस्थांना अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत तसेच त्याच्या अर्जाच्या अनुषंगाने निरीक्षण करून प्रस्ताव सादर करण्याबाबत .**

संदर्भ :- (१) शासन पत्र क्र.व्हिओसी-२०२१/प्र.क्र.९२/कौशल्य-२,दिनांक-०२/०९/२०२१.
(२) मंडळाचे परिपत्रक क्रमांक मराकौविमं/का. क्र १/२०२१-२२/३३४४, दिनांक ०७/०९/२०२१

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये शासनाने महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यासाठी राबविण्यास इच्छुक नोंदणीकृत संस्थांना अर्ज करण्याबाबतची मान्यता प्रक्रिया निरंतर चालू ठेवण्यास मान्यता दिली आहे.

सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना कळविण्यात येते की,त्यांनी शासनाच्या निर्देशाचे अनुपालन करून सदर अर्ज निरंतर प्रक्रियेत स्वीकारण्याची पुढील कार्यवाही करावी.

मंडळाच्या संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकान्वये खाली दिलेल्या निरीक्षण समितीच्या सुचनेच्या अनुषंगाने पूर्तता करून संबंधित संस्थेचा परिपूर्ण प्रस्ताव सर्व संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आधिकारी यांनी संबंधित संस्थेचा परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसात निरीक्षण करून निरीक्षण अहवाल त्यांच्या शिफारशीसह मंडळ कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी.

निरीक्षण समितीसाठी सूचना :-

१) निरीक्षण समितीने ट्रस्ट /संस्थेने विहीत नमुन्यात केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे कौशल्य प्रशिक्षण संस्थेत प्रत्यक्ष भेट देवून प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पाहणी करावी व तसेच आवश्यक कागदपत्रे तपासून /छाननी करून त्याच्या योग्यतेबद्दल व अचूकते बद्दल खात्री करावी.

२) निरीक्षण समितीने प्रत्यक्ष भेट देवून तपासणी केल्यानंतरच समितीने त्यांचे अभिप्राय एकमताने निर्णय घेऊन निरीक्षण अहवालाच्या संबंधित तक्त्यात माहिती नमूद करावी.

३) मंडळाने निश्चित केलेल्या मानकांच्या मर्यादेत निरीक्षण समितीने आवश्यकते प्रमाणे अभिप्राय नमूद करून आवश्यक अतिरिक्त कागदपत्रे प्रपत्रासोबत जोडावीत व अनावश्यक कागदपत्रे प्रपत्रासोबत जोडण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

४) प्रस्तावातील प्रत्येक कागदपत्रांवर क्रमांक लिहावेत.

५) निरीक्षण समितीने विद्यार्थी व शिक्षकाचे गुणोत्तर हे २५ : १ या प्रमाणे आवश्यक पात्र शिक्षकाची नेमणूक करण्यात आलेली आहे याची खात्री करावी.

६) निरीक्षण समितीने इतर आवश्यक साधन सामुग्री /यंत्रसामुग्री / जागा/ सुविधा या मंडळाच्या नियमा प्रमाणे असल्याची खात्री करावी व सदर बाबी तपासताना व्यवसाय अभ्यासक्रम अर्धवेळ आहे की पूर्णवेळ आहे हा मुद्दा विचारात घ्यावा.

७) निरीक्षण समितीने व्यवसाय अभ्यासक्रम अर्धवेळ असल्यास आवश्यक साधनसामुग्री/यंत्रसामुग्री /जागा/सुविधा इत्यादी प्रशिक्षणाच्या वेळापत्रकाचे अवलोकन करून विचारात घ्यावा व त्याप्रमाणे आपले अभिप्राय नोंदवावे.

(डॉ.अ.म.जाधव)

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ,मुंबई

प्रति,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय (सर्व)

प्रत,

१) मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आवश्यक माहितीसाठी व अवलोकनार्थ सादर

२) संगणक विभाग

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता विभाग,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय ,मुंबई- ४०००३२.

दिनांक : ०२ सप्टेंबर,२०२१

सिओसी-२०२१/प्र.क्र.९२/कौशल्य-२

प्रति,

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ,

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क-विभाग,

२ रा मजला,४९,खेरवाडी,

वांद्रे (पू.),मुंबई -५१

विषय :- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत राबविण्यात येणारे प्रमाणपत्र व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यास इच्छुक असलेल्या संस्थाना अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.मराकौविमं/का-१/मान्यताविभाग/न्यायप्रक्र/२०२१/३१२३ दि.२९/०७/२०२१

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत ६ महिने,१ वर्ष व २ वर्ष कालावधीचे प्रमाणपत्र व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येत असल्यामूळे तसेच टेलर मेड अभ्यासक्रमाबाबत निरंतर प्रक्रीया सुरू ठेवणे आवश्यक असल्यामूळे नवीन संस्थेसाठी मान्यता प्रक्रीया निरंतर सुरू ठेवणे आवश्यक असल्याचे अभिप्राय संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झाले होते.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या प्रमाणपत्र व्यवसाय अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यासाठी इच्छुक नोंदणीकृत संस्थांना अर्ज करण्याबाबतची मान्यता प्रक्रीया निरंतर चालु ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

आपला,

श्री.गोपतवाड

(ज्ञानेश्वर गोपतवाड)

कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन